जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक १६५ | मंगळवार, ६ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### नववीच्या विद्यार्थ्यांची गळफास घेऊन आत्महत्या

**लोणी काळभोर, ता. ५ :** नववीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थ्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सूर्या पार्क परिसरात घडली असून सोमवारी (ता. ५) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली आहे. यश संतोष जाधव (वय अंदाजे १५) असे आत्महत्या करण्यात आलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, यश हा हडपसर येथील साधना शाळेत नववीच्या वर्गात शिक्षण घेत होता. यशचे आई वडील व भाऊ हे सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास कामावर निघून गेले होते. यश हा घरी एकटाच होता. व नेहमीप्रमाणे तो सकाळी अकरा वाजता शाळेत जाणार होता. दरम्यान, यश चे वडील संतोष जाधव हे कामावरून सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घरी आले. तेव्हा यश हा घरात फॅनच्या अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. व घटनास्थळी खुर्ची पडलेली होती. या घटनेमुळे जाधव कुटुंबाला धक्का बसला आहे.

# जिल्हा परिषद निवडणुकांचे बिगुल कुठल्याही क्षणी वाजणार ?

## पूर्व हवेलीत निवडणुकीची रणधुमाळी सुरु; इच्छुक उमेदवारांकडून जोरदार प्रचाराला सुरुवात

**लोणी काळभोर, ता. ५ :** पुणे जिल्हा परिषदेची ७३ गट आणि १४६ गणांची अंतिम प्रभाग रचना व आरक्षण जाहीर झाले आहे. सन २०११ च्या जनगणनेप्रमाणे सर्वोच्च लोकसंख्येकडून उतरत्या क्रमाने आरक्षित झाल्याने उरुळी कांचन, लोणी काळभोर हे गट अनुसूचित जाती तर थेऊर आणि कोरेगाव मूळ गट हा खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. जिल्हा परिषदांच्या निवडणुकांचे बिगुल कुठल्याही क्षणी वाजू शकते. तत्पूर्वीच इच्छुक उमेदवारांनी जोरदार प्रचार सुरु केला असून पक्षश्रेष्टींकडे तिकीटासाठी वशिला लावला आहे. परंतु, कोणाला कोणत्या पक्षाचे तिकिट मिळेल? व नाराज झालेला वर्ग काय भूमिका घेणार? यावर पूर्व हवेलीतील राजकारण अवलंबून असणार आहे.

लोणी काळभोर जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीसाठी



(महिला) राखीव ठेवण्यात आला आहे. या गटातून सोनम ज्ञानेश्वर नामगुडे, शीतल सुजित कांबळे, अनिता सुर्यकांत गवळी, सिंपल गणेश कांबळे, पूनम बाबुराव गायकवाड (काळभोर), कलावती अश्रुबा धेले हे सध्यातरी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे दिसून येत आहे. तर काही उमेदवारांनी होम टू होम प्रचार सुरु केला आहे. लोणी काळभोर पंचायत समिती गणातून उमेदवारांची नावे अजून गुलदस्त्यात आहेत. परंतु, कदमवाकवस्ती पंचायत समिती गणातून प्रकाश नारायण भिसे, अमोल टेकाळे, नितीन लोखंडे, राहुल जोगदंड व राकेश लोंढे हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे असल्याचे दिसून येत आहेत.

### नाराज उमेदवारांची समजूत काढणाराच पक्ष बाजी मारणार?

सध्या महानगरपालिकांवर आपला झेंडा फडकाविण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी शड्डू ठोकला आहे. तर राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हा परिषदांच्या निवडणुकीचा कार्यक्रम कु१ठल्याही क्षणी जाहीर होऊ शकतो. इच्छुक उमेदवारांनी प्रचाराला सुरवात केली असून पक्षश्रेष्टींकडे उमेदवारी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहे. एकाच पक्षाकडून उमेदवारी मिळावी. म्हणून अनेक उमेदवार रांगेत उभे आहेत. परंतु, पक्षाकडून अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नाही. पक्षाने उमेदवार जाहीर केल्यानंतर तिकिट कापलेल ाउमेदवार बंड करण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे जो पक्ष नाराज झालेल्या उमेदवाराची नाराजी देऊ करण्यासाठी यशस्वी ठरेल? तो पक्ष या निवडणुकीत निश्चित बाजी मारणार असे राजकीय जाणकारांचे मत आहे. तर यावरच पूर्व हवेलीतील संपूर्ण राजकारण अवलंबून असणार आहे.

सद्यातरी इच्छुकांचा वैयक्तिक भेटीगाठींवर भर दिला आहे. सर्व जण आपआपल्यापरीने मतदारांपर्यंत पोचून चाचपणी करीत आहेत.

थेऊर जिल्हा परिषद गट हा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी (महिला) राखीव ठेवण्यात आला आहे. या गटातून पल्लवी युवराज काकडे, कोमल संदेश आव्हाळे, सायली तेजस शिवरकर, सीमा प्रकाश सावंत, पूनम अशोक गायकवाड हे पाच उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहे. काही उमेदवारांनी देवदर्शन, आरोग्य शिबिरे व होम टू होम प्रचार करून निवडणुकीच्या रणधुमाळीत आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. थेऊर गणातून सिद्धांत सचिन तुपे, संग्राम मच्छिंद्र कोतवाल, योगेश दत्तात्रय काकडे व संतोष कुंजीर (दादा पाटील) हे उमेदवार निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

कोरेगाव मूळ-केसनंद जिल्हा परिषद गटाचे आरक्षण सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. या गटातून जिल्हा परिषदेसाठी सुरेखा रमेश हरगुडे, सुरेखा शिवाजी भोरडे निवडणुकीच्या रणांगणात उतरले आहेत. तर कोरेगाव मूळ गणात उद्योजक कृषिराज उर्फ मनोज दत्तात्रय चौधरी, पेठचे माजी सरपंच सूरज चौधरी, योगेश साठे, बाळासाहेब साठे, कोरेगाव मूळचे माजी सरपंच मंगेश कानकाटे, माजी सरपंच विठ्ठल शितोळे, प्रितम शितोळे आदि इच्छुक आहेत.

उरुळी कांचन जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या गटातून माजी उपसरपंच जितेंद्र बडेकर, उरुळी कांचन ग्राम पंचायतीचे विद्यमान सदस्य शंकर बडेकर, मणिभाई देसाई पतसंस्थेचे संचालक जीवन शिंदे, योगेश सातपुते, महादेव कांबळे, गणेश कांबळे, राहुल जगताप, आबासाहेब चव्हाण आदींनी आपली दावेदारी निश्चित असल्याचे समाज माध्यमांवर जाहीर केली आहे. उरुळी कांचन गण हा अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. या गणातून सारिका लोणारी, सुषमा चव्हाण, कोमल कांबळे, या इच्छुकांची नावे सध्या चर्चेत आहेत.

दरम्यान, सोरतापवाडी गणाचे आरक्षण नागरिकांचा मागास प्रवर्ग सुटल्याने या गणातून भाजपा नेते सुदर्शन चौधरी, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) जिल्हा युवकाध्यक्ष व शिंदवणेचे माजी सरपंच आण्णा महाडिक, राष्ट्रवादीचे निखिल कांचन, भाजपच्या पूजा सणस, काका कुंजीर, तरडयाचे माजी सरपंच मारुती बरकडे, सुदाम गडदे हे निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

---

## वाहतूक कोंडीला आणि खड्ड्यांना भाजपची स्थानिक 'त्रिमुर्ती' जबाबदार : अजित पवार

**पुणे, ता. ५ :** पुणे महापालिका निवडणुकीच्या धामधुमीत सध्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या प्रभाग ९ चे उमेदवार अमोल बालवडकर यांच्या समर्थनार्थ आयोजित सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांवर कडाडून टीका केली. पुण्याच्या विकासात इथले स्थानिक कारभारी अडथळा ठरत असल्याचा दावा त्यांनी यावेळी केला. गेल्या ३५ वर्षांच्या राजकारणात अनेक निवडणुका पाहिल्याचे सांगत त्यांनी पुण्याच्या वाहतूक कोंडीला आणि रस्त्यांवरील खड्ड्यांना भाजपची स्थानिक 'त्रिमुर्ती' जबाबदार असल्याचे म्हटले.



अजित पवार भाषणादरम्यान म्हणाले की, पुणे शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी मला एकदा संधी द्या. केंद्र आणि राज्य सरकारने शहरासाठी मोठा निधी दिला, पण इथल्या नेत्यांना तो नीट वापरता आला नाही. चंद्रकांत पाटील यांचा थेट उल्लेख टाळत त्यांनी टोला लगावला की, पुणेकरांनी आपली माणसे ओळखायला हवीत, कारण बाहेरून आलेले लोक पुन्हा निघून जातील. पालकमंत्री म्हणून आपण आपली जबाबदारी चोख पार पाडत असून आपण शब्दाचे पक्के असल्याचेही त्यांनी ठामपणे सांगितले.

अमोल बालवडकर यांनी पक्ष वाढवण्यासाठी खूप मेहनत घेतली, मात्र तरीही त्यांना डावलण्यात आले हा त्यांचा अपमान असल्याचे पवार म्हणाले. ज्यांच्या डोक्यात सत्ता गेली आहे, त्यांना जागा दाखवून देण्याची वेळ आली असून येत्या १५ तारखेला या अपमानाचा बदला मतदानातून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, अजित पवार यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे भाजपच्या स्थानिक गोटात मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे. पवारांनी थेट 'बाहेरचे लोक' असा उल्लेख केल्याने निवडणुकीच्या रिंगणातनवा वाद रंगण्याची शक्यता आहे. दरम्यान, पुणेकर नेमका कोणाला कौल देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी खुशखबर; महागाई भत्त्यात २% वाढीची शक्यता

**नवी दिल्ली, ता. ०५ :** नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी आनंदाची बातमी आहे. नोव्हेंबरच्या अखिल भारतीय औद्योगिक श्रमिक ग्राहक किंमत निर्देशांक आकडेवारीनुसार, जानेवारी २०२६ पासून महागाई भत्त्यात २ टक्के वाढ होण्याची दाट शक्यता आहे. यामुळे सध्याचा ५८ टक्केवर असलेला डीए आता ६० टक्केवर पोहोचेल. जर एखाद्या कर्मचाऱ्याचा मूळ पगार ५० हजार रुपये असेल, तर ५८ टक्के नुसार त्याला २९ हजार रुपये डीए मिळत होता. आता ६० टक्के प्रमाणे तो ३० हजार रुपये होईल, म्हणजेच दरमहा १ हजारची थेट वाढ होईल. तज्ज्ञांच्या मते, ८ व्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीपूर्वी डीए जितका जास्त वाढेल, तितकाच फायदा फिटमेंट फॅक्टर ठरवताना होईल.

## उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अभिजीत तांबिले यांचे कृषीमंत्र्यांना सविस्तर निवेदन

आदित्य बोराटे

इंदापूर, ता. ५ : इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव, कांदलगाव व तरडगाव येथील उजनी धरण प्रकल्पासाठी संपादित जमिनींच्या मूळ मालक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या अन्यायाला वाचा फुटावी, या मागणीसाठी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अभिजीत राजेंद्र तांबिले यांनी राज्याचे कृषी मंत्री मा. दत्तात्रय (दत्तामामा) भरणे यांची भेट घेऊन सविस्तर लेखी निवेदन सादर केले.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १९७० च्या दशकात उजनी धरण प्रकल्पासाठी इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव, कांदलगाव व तरडगाव या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी माती-मुरूम उचलण्यासाठी शासनाने संपादित केल्या होत्या. त्या काळात शेतकऱ्यांनी मोठ्या त्यागातून आपल्या सुपीक जमिनी दिल्या. मात्र कालांतराने विविध धोरणात्मक निर्णय व अंमलबजावणीतील त्रुटींमुळे मूळ जमीनमालक शेतकऱ्यांचे हक्क बाधित झाले आहेत.

अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने पाणीपट्टी भरून शेती विकसित केली असूनही आज त्यांना जमिनीच्या मालकी व वहिवाटीबाबत गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेक कुटुंबांची उपजीविका धोक्यात आली असून हा प्रश्न केवळ कायदेशीर नसून सामाजिक व मानवी दृष्टिकोनातूनही अत्यंत गंभीर असल्याचे अभिजीत तांबिले यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले की, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी यापूर्वी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक विचार करून वहिवाटीचे आदेश दिले होते. मात्र आता पुन्हा शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी जलसंपदा मंत्री मा. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी चर्चा करून ठोस व कायमस्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे.

उजनी प्रकल्पग्रस्त तीनही गावांतील सुमारे २ हजार एकर जमिनीच्या मूळ जमीनमालक शेतकऱ्यांच्या हक्कांचा पुनर्विचार करून ते सुरक्षित करावेत, अशी ठाम मागणी तांबिले यांनी शासनाकडे केली आहे. या निवेदनासोबत संबंधित शेतकऱ्यांच्या सह्यांची यादीही जोडण्यात आली आहे.

दरम्यान, कृषी मंत्री मा. दत्तात्रय भरणे यांनी या विषयाची गंभीर दखल घेत शासनस्तरावर योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे अभिजीत तांबिले यांनी सांगितले. उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी हा लढा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## टिळेकरवाडीच्या उपसरपंचपदी कल्पना टिळेकर बिनविरोध

**उरुळी कांचन, ता. ५ :** टिळेकरवाडी (ता. हवेली) येथील ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी कल्पना श्रीकांत टिळेकर यांची सोमवारी (ता. ०५) बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच वैशाली चौरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने सरपंच गोवर्धन टिळेकर यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंचपदाची निवडणूक घेण्यात आली.



या निवडणुकीत कल्पना टिळेकर यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी गोवर्धन टिळेकर यांनी कल्पना टिळेकर यांची निवड बिनविरोध झाल्याची घोषणा केली. ग्रामपंचायत आधिकारी प्रवीण खराडे यांनी निवडणूकीचे कामकाज पाहिले.

यावेळी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र टिळेकर, माजी सरपंच सुभाष लोणकर, गणेश टिळेकर, माजी उपसरपंच सुषमा टिळेकर, नंदा राऊत, वैशाली चौरे, सुशील राऊत, संतोष टिळेकर, पोलीस पाटील विजय टिळेकर, सोसायटी अध्यक्ष अक्षय टिळेकर, लक्ष्मण टिळेकर, सुभाष टिळेकर, बाळासाहेब चौरे, रोहिदास टिळेकर, तंटामुक्त अध्यक्ष अमर टिळेकर, महेश टिळेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नवनिर्वाचित उपसरपंच कल्पना टिळेकर निवडीनंतर म्हणाल्या, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उर्वरित कामे सर्वांना सोबत घेऊन पूर्ण करणार आहे.

## उरुळी कांचन येथील ग्रामस्वच्छता ग्रुपच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदात्यांचा रेकोर्डब्रेक प्रतिसाद

### ९४५ रक्तदात्यांनी केले रक्तदान, ४१ महिलांचा समावेश तर २५३ युवकांचे पहिल्यांदाच रक्तदान

हनुमंत चिकणे

उरुळी कांचन, ता. ५ : पर्यावरणपूरक उपक्रमांची जाणीवपूर्वक अंमलबजावणी ही आजच्या काळाची गरज आहे असे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्य वनसंरक्षक तथा सर्वोच्च न्यायालय गठीत पर्यावरण समितीचे सदस्य सदस्य सुनील लिमये यांनी केले.

उरुळी कांचन (ता. हवेली) येथील येथील 'ड्रीम्स युवा सोशल फाऊंडेशन' संचलित उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त महा रक्तदान शिबिराचे आयोजन, बी. जी. शिर्के बाल विकास केंद्र उरुळी कांचन येथे रविवारी (ता. ०४) करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन सुनील लिमये यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लिमये बोलत होते.

या महा रक्तदान शिबिरात रेकॉर्डब्रेक असे एकूण ९४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले, यामध्ये २५३ युवकांनी पहिल्यांदाच रक्तदान करून सामाजिक जबाबदारीचे भान दाखवले, तर ४१ महिलांनीही रक्तदानात सक्रिय सहभाग नोंदवला. या शिबिरासाठी ससून ब्लड बँक, तर्पण ब्लड बँक, महा ब्लड बँक, आणि स्पंदन ब्लड बँक यांनी सहकार्य केले. रक्तसंकलनाची प्रक्रिया नियोजनबद्ध व सुरक्षित पद्धतीने पार पडली.



यावेळी उपवन संरक्षक पुणे विभागचे महादेव मोहिते, हवेलीचे ज्येष्ठ नेते व महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष प्रा. के डी. कांचन, पंडित दीनदयाल उपाध्याय ग्रामीण युवक कौशल्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तुषार माळी, ज्येष्ठ नेते महादेव कांचन, राजाराम कांचन, अलंकार कांचन, संतोष कांचन, उरुळी कांचनचे सरपंच मिलिंद जगताप, माजी सरपंच संतोष कांचन, माजी उपसरपंच संचिता कांचन, सीमा तुपे, युवराज कांचन, उद्योजक जे.बी. सराफ, तुकाराम चौधरी, एकनाथ चौधरी, सुभाष टिळेकर, उरुळी कांचन ग्रामस्वच्छता अभियान ग्रुपचे संतोष चौधरी, अजिंक्य कांचन, शांताराम चौधरी, किरण वांजे, शैलेश गायकवाड, शैलेश बाबर, शिवाजी नवगिरे, रमेश महाडिक, सोमनाथ बगाडे यांच्यासह परिवहन विभागाचे मोटार निरिक्षक कलमबरकर, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, परिसरातील पुढारी, नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कलमबरकर यांनी रस्ते वाहतुक सुरक्षिततेबद्द्ल मार्गदर्शन केले आणि वाहतुक नियमांचे पालन करण्याबाबतची शपथ दिली. प्रमुख पाहुणे महादेव मोहिते यांनी आगामी काळात वन विभागाकडून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धन कार्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, तसेच शिंदवणे घाट परिसरात ऑक्सिजन पार्क उभारण्यासाठी वन विभाग सक्रिय भूमिका बजावेल अशी ग्वाही दिली.

अध्यक्षीय भाषणात प्रा. के डी. कांचन यांनी ड्रिम्स युवा सोशल फाऊंडेशनच्या समाजोपयोगी कार्यातील सातत्याचे विशेष कौतुक केले. संस्थेच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होत असून भविष्यातही स्थानिक संस्था, ग्रामपंचायत आणि नागरिकांचे पूर्ण सहकार्य व सक्रिय सहभाग राहील असे सांगितले.

दरम्यान, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील शेलार यांनी केले. प्रास्ताविक निलेश जाधव यांनी ड्रिम्स युवा सोशल फाऊंडेशनच्या ११ वर्षांच्या सामाजिक कार्याचा आढावा मांडला, तर आभार प्रदर्शन अथर्व कदम यांनी केले.

पुणे प्राईम न्यूज — जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

## संक्षिप्त



### मी परळी धनंजय मुंडेंना देऊन टाकली; पंकजा मुंडेंच्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

**बीड, ता. ५ :** आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराचा धडाका सुरू असताना भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी एक खळबळजनक विधान केलेय. मी परळी आता धनंजय मुंडेंना देऊन टाकलीय, आता मला माळाकोळीवर प्रेम करू द्या, असे वक्तव्य त्यांनी नांदेडमधील एका सभेत केले. राज्यातील बदललेल्या राजकीय समीकरणांमुळे मुंडे बहीण-भाऊ सध्या महायुतीत एकत्र आहेत. मात्र, परळी मतदारसंघावर पंकजा मुंडे यांचा दावा कायम मानला जात असतानाच, त्यांनी स्वतःहून परळी धनंजय मुंडेंसाठी सोडल्याचे संकेत दिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. आगामी निवडणुकीत परळीतून नेमकी उमेदवारी कुणाची असणार, याबाबत या विधानामुळे आता राजकीय चर्चांना उधाण आलेय.

### भाजपला शिंदे शिवसेना नकोय : उद्योगमंत्री उदय सामंत



**पिंपरी, ता. ५ :** भाजपसोबत युती करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. परंतु, त्यांनी गाफील ठेवत युती केली नाही. शिंदे शिवसेनेच्या विश्वासघाताची आणि भाजपच्या भ्रष्टाचाराविरोधातील ही निवडणूक आहे. शिंदेसेनेचे बरचेसे काम उपमुख्यमंत्री अजित पवार हलकेकरत आहेत. त्यामुळे पवार जे म्हणतील त्याला मम म्हणायचे, असे आवाहन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. शिंदेसेना भाजपसोबत असता, तर काही लोकांची ढाल बनलो असतो. पण, त्यांना शिवसेना नकोच आहे. त्यामुळे लाचारी करायची देखील काही गरज नव्हती, असेही सामंत म्हणाले. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीतील शिंदे सेनेच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ सामंत यांच्या उपस्थितीत शनिवारी वाकड येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. शेवटच्या तीन दिवसात दबाव, दादागिरीचे राजकारण केले जाऊ शकते. या सगळ्या गोष्टीसमोर छातीठोकपणे उभे रहावे. शिंदे सेनेच्या उमेदवारांनी कोणालाही घाबरु नये, असे आवाहनही त्यांनी केले.

### शिवाजीनगर येथील मांढरदेवी काळूबाई मंदिरात चोरी

**पुणे, ता. ५ :** पुणे शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या शिवाजीनगर येथील एका जुन्या मंदिरात चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी मांढरदेवी काळूबाई मंदिराचे कुलूप तोडून देवीचा मौल्यवान चांदीचा मुकुट चोरून नेला. मध्यरात्रीच्या सुमारास हा सर्व प्रकार घडला असून शनिवारी सकाळी जेव्हा भाविक मंदिरात आले तेव्हा ही चोरी लक्षात आली.सुमारे ३ हजार रुपये किमतीचा हा चांदीचा मुकुट होता. या घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि भाविकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. शिवाजीनगर पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासायला सुरुवात केली आहे.पुण्यातील गर्दीच्या आणि मुख्य समजल्या जाणाऱ्या शिवाजीनगर भागात ही घटना घडल्याने मंदिरांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी आणि चोरट्यांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी आग्रही मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे. पोलीस सध्या या प्रकरणाचा वेगाने तपास करत असून, सीसीटीव्हीच्या मदतीने आरोपींपर्यंत पोहोचण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

### निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध; निवडीला मनसे, काँग्रेसचे हायकोर्टात आव्हान

**मुंबई, ता. ५ :** राज्यातील २९ महापालिका निवडणुकांमध्ये जवळपास ६७ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वातावरण तापले आहे. या निवडींविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि काँग्रेसने सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. सत्ताधारी महायुतीने दबावतंत्र आणि पैशांचा वापर करून उमेदवारांना अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी केलाय. या याचिकेद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या तटस्थतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, संपूर्ण प्रकरणाची हायकोर्टाच्या निगराणीखाली चौकशी करण्याची मागणी करण्यात आलीय. लोकप्रतिनिधित्व कायद्यात बिनविरोध निवडीची संकल्पना नाही, असा दावा करत चौकशी पूर्ण होईपर्यंत या जागांचे निकाल जाहीर करू नयेत, अशी विनंतीही न्यायालयात करण्यात आलीय. विशेषतः कल्याण-डोंबिवली, जळगाव आणि ठाणे येथील मोठ्या संख्येने झालेल्या बिनविरोध निवडी आता न्यायप्रविष्ट झाल्यात.

# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप-राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये राडा

## सोसायटीत प्रचार करायचा नाही म्हणत गेटलाच ठोकलं टाळं

**पुणे, ता. ५ :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराचा जोर वाढलेला असताना पिंपरी-चिंचवड शहरात मोठा गोंधळ उडाल्याची घटना समोर आली आहे. प्रभाग क्रमांक ९ मध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये थेट सामना झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सायंकाळच्या सुमारास भाजपचे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते प्रभाग क्रमांक ९ मधील एका गृहनिर्माण सोसायटीत प्रचारासाठी गेले होते. मात्र, यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या समर्थकांनी भाजप उमेदवारांनी या सोसायटीत



प्रचार करू नये, अशी भूमिका घेतली. यावरून वाद निर्माण झाला आणि राष्ट्रवादीच्या काही समर्थकांनी थेट सोसायटीच्या मुख्य गेटला टाळे ठोकल्याचे सांगण्यात येत आहे.

अचानक घडलेल्या या प्रकारामुळे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वाद झाला. दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते एकमेकांसमोर उभे ठाकल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली आणि दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांना शांतता राखण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांच्या समजावणीनंतर दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते घटनास्थळावरून निघून गेल्याची माहिती आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही हिंसक घटना घडली नाही तसेच कोणीही जखमी झाल्याची नोंद नाही.

दरम्यान, या प्रकारामुळे निवडणूक प्रचारादरम्यान वाढणाऱ्या तणावाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अशा घटना कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करू शकतात, असे मत स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. प्रचारादरम्यान नियमांचे पालन व्हावे यासाठी निवडणूक आयोग आणि पोलिस प्रशासनाने अधिक कडक भूमिका घ्यावी, अशी मागणीही या घटनेनंतर पुढे येत आहे.

### भाषण करताना नारायण राणे यांना भोवळ

**चिपळूण, ता. ५ :** भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची कृषी महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी भाषण करताना प्रकृती बिघडली.

चिपळूण येथील कृषी व पशुधन प्रदर्शन २०२६ मध्ये संबोधित करताना राणेंना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि व्यासपीठावरच भोवळ आली. सुरक्षा रक्षकांनी त्यांना तातडीने आधार देत खुर्चीवर बसवले. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे हा त्रास झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विशेष म्हणजे, कालच राणे यांनी वयोम ानाचे कारण देत राजकीय निवृत्तीचे संकेत दिले होते. मुलांच्या राजकीय स्थिरतेनंतर आता व्यवसायाकडे लक्ष देण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. या घटनेनंतर काही काळ विश्रांती घेऊन ते विश्रामगृहाकडे रवाना झाले असून, त्यांच्या प्रकृतीबाबत समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये आलिशान मर्सिडीजमधून दारूची तस्करी; भोसरी पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे, ता. ५ :** पिंपरी-चिंचवड परिसरात बेकायदेशीर दारू वाहतुकीवर पोलिसांनी कडक कारवाई करत आलिशान मर्सिडीज कारमधून दारूची तस्करी करणाऱ्या एका वाहतूक व्यावसायिकाला अटक केली आहे. ही कारवाई रविवारी दुपारी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर सुभाष बोराटे (वय ३८, रा. बोऱ्हाडेवाडी, मोशी) हा MH १४ JL ४७३७ क्रमांकाच्या मर्सिडीज-बेंझ कारमधून कोणताही परवाना नसताना दारूची वाहतूक करत होता. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपीला रंगेहाथ पकडले. कारवाईदरम्यान पोलिसांनी ४ हजार १७० रुपये किमतीची दारू,



५० हजार रुपये रोख रक्कम आणि सुमारे २६ लाख रुपये किमतीची मर्सिडीज कार असा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल संदीप आश्रुबा सौदागर यांनी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडमध्ये बेकायदेशीर दारू वाहतुकीची आणखी एक घटना उघडकीस आली आहे. पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण रोडवर विनापरवाना देशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका हॉटेलचालकाला पोलिसांनी अटक केली आहे. शनिवारी रात्री हाफकिन कंपनीच्या मागील सुरक्षा भिंतीजवळ संत तुकाराम नगर पोलिसांनी ही कारवाई केली.

याप्रकरणी ज्ञानेश्वर तानाजी शिंदे (वय ४१, रा. भोसरी) याला ॲक्टिवा स्कूटरवरून देशी दारूच्या २९८ सीलबंद बाटल्या विक्रीसाठी नेत असताना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी ११ हजार ९२० रुपये किमतीची दारू व दुचाकीसह एकूण ७१ हजार ९२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला नोटीस बजावण्यात आली असून या प्रकरणाचा तपास संत तुकाराम नगर पोलिस करत आहेत. बेकायदेशीर दारू विक्री व वाहतुकीविरोधात पोलिसांनी कारवाई तीव्र केल्याने शहरात अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास शरद पवारांना समाधान वाटेल : निलेश लंके

**पिंपरी, ता. ५ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट पुन्हा एकत्र आल्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाही समाधान वाटेल, असे वक्तव्य खासदार निलेश लंके यांनी रविवारी (ता. ४) केले. वाकड येथे पत्रकारांशी बोलताना दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याबाबत विचारले असता त्यांनी ही भूमिका मांडली.सध्या पिंपरी चिंचवड शहरासह राज्यामध्ये महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे.

पुणे व पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित लढत आहे. याबाबत विचारले असता खासदार लंकेम्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस हा केवळ राजकीय पक्ष नसून तो शरद पवारांचा परिवार आहे. राजकीय कालखंडात हा परिवार जर एकसंघ राहिला तर त्याचा आनंदच होईल. राष्ट्रवादीत दोन गट पडले असले तरी सुख-दुःखात हे सर्व नेते आणि कार्यकर्ते एकत्र राहिले




आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा विकास हा शरद पवार यांच्या नेतृत्वामुळे झाला असून अजित पवारांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत विकासाची कामे केली आहेत. त्यामुळे भविष्यात दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र आल्यास हा निर्णय सर्वसामान्य नागरिकही स्वीकारतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राजकारण हे क्षणाक्षणाला बदलत असते. त्यामुळे कोणतेही ठाम भाकीत करता येत नाही. वाट पाहू आणि बघू, असे सांगत लंके यांनी पुढील काळात राजकीय समीकरणे बदलू शकतात, असे संकेत दिले.

## पुणे-सोलापूर मार्गावरील अनेक रेल्वे गाड्या रद्द; १५ ते २५ जानेवारीदरम्यान मेगा ब्लॉक

**पुणे, ता. ५ :** रेल्वेने प्रवास करणाऱ्या पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. दौंडमनमाड रेल्वे मार्गावर दुहेरीकरणाचे काम सुरू करण्यात येणार असून, या कामासाठी दौंड ते काष्टी स्थानकांदरम्यान १५ ते २५ जानेवारीदरम्यान विशेष मेगा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे पुण्यातून धावणाऱ्या अनेक प्रवासी गाड्यांवर परिणाम होणार आहे.

रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या कालावधीत प्री-नॉन इंटरलॉकिंग आणि नॉन-इंटरलॉकिंग कामे केली जाणार आहेत. यासाठी ट्रॉफिक आणि वीजपुरवठा ब्लॉक घेतला जाणार असून, पुणे सोलापूर तसेच पुणेअमरावती मार्गावरील रेल्वे सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळीत होणार आहे.

मेगा ब्लॉकच्या काळात पुणे




सोलापूर एक्स्प्रेस, सोलापूर पुणे एक्स्प्रेस, सोलापूर पुणे इंटरसिटी एक्स्प्रेस, पुणे सोलापूर डीईएमयू, सोलापूर पुणे डीईएमयू आणि पुणे दौंड डीईएमयू या गाड्या पूर्णपणे रद्द करण्यात आल्या आहेत. याशिवाय काही गाड्या अर्ध्या मार्गापर्यंतच धावणार आहेत. इंदूरदौंड आणि ग्वाल्हेरदौंड एक्स्प्रेस या गाड्या दौंडऐवजी खडकी स्थानकापर्यंतच चालवण्यात येणार आहेत.

दरम्यान, प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना रेल्वेचे अद्ययावत वेळापत्रक तपासावे आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## मढेघाटात ट्रेकिंगला गेलेल्या विद्यार्थ्यांवर मधमाशांचा हल्ला; ३५ हून अधिक जण जखमी

**वेल्हे, ता. ५ :** पुण्यातील वेल्हे तालुक्यातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ असलेल्या मढेघाट परिसरात ट्रेकिंगसाठी गेलेल्या शालेय विद्यार्थ्यांवर आग्या मोहोळाच्या मधमाशांनी भीषण हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका खासगी ट्रेकिंग क्लबच्या माध्यमातून सुमारे ५० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि त्यांचे मार्गदर्शक मढेघाट ते उपंडा असा ट्रेक करण्यासाठी गेले होते. रविवारी (ता. ५) संध्याकाळी मढे घाट उतरत असताना मध्यभागी असलेल्या झाडीतून जात असताना झाडावरील मधमाश्यांनी थेट विद्यार्थ्यांवर हल्ला चढवला. या अनपेक्षित संकटामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठी पळापळ झाली आणि भीतीचे वातावरण पसरले.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ मदतीसाठी



धावून आले. तोरण माची हॉटेलचे मालक अभिजीत भेके यांनी सोशल मीडियावरून मदतीचे आवाहन केले, त्यानंतर केळद गावचे माजी सरपंच रमेश शिंदे आणि इतर नागरिकांनी कड्यामध्ये अडकलेल्या विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. या हल्ल्यात ३५ पेक्षा जास्त विद्यार्थी जखमी झाले असून त्यापैकी ८ ते १० जणांना मधमाशांनी मोठ्या प्रमाणात दंश केला आहे.

जखमी विद्यार्थ्यांना १०८ रुग्णवाहिका आणि खासगी गाड्यांमधून तातडीने वेल्हे येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. अंबादास देवकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, अधिक त्रास होत असलेल्या २ विद्यार्थ्यांना पुढील उपचारांसाठी पुण्यातील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. इतर सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती आता स्थिर असून त्यांच्यावर वेल्हे येथे उपचार सुरू आहेत.

# हाच का दादांचा वादा? जमिनी लाटणाऱ्यांचा प्रचार करणार का?

## अजितदादांना प्रश्न विचारणारे बॅनर्स व्हायरल

**पुणे, ता. ५ :** पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आता पोस्टर युद्ध सुरू झाले असून उपमुख्यमंत्री अजित पवार विरोधकांच्या निशाण्यावर आले आहेत. प्रभाग ९ मध्ये लागलेल्या बॅनरवर हाच का दादाचा वादा? असा सवाल विचारण्यात आला असून याची संपूर्ण पुणे शहरात चर्चा रंगली आहे. या बॅनरच्या माध्यमातून मतदारांनी अजित पवार यांना काही थेट आणि टोकदार प्रश्न विचारले आहेत.




या बॅनरवर प्रामुख्याने प्रभाग ९ मधील अवैध धंदे करणारे, जमिनी लाटणारे आणि पैसे वाटप करणाऱ्यांचा तुम्ही प्रचार करणार का, असे प्रश्न विचारून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे आज संध्याकाळी याच परिसरात अजित पवार यांची जाहीर सभा होणार आहे. त्यापूर्वीच अशा प्रकारचे बॅनर लागल्याने खळबळ उडाली आहे. स्वतःला नाराज मतदार म्हणवून घेणाऱ्यांनी हे फलक लावले असून दादांकडून ही अपेक्षा नव्हती असेही त्यावर लिहिले आहे.

राज्यात महायुती असली तरी पुण्यात मात्र भाजप आणि अजित पवार यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना तिकीट दिल्याच्या मुद्द्यावरून भाजपने राष्ट्रवादीला घेरले होते, तर त्याला अजित पवारांनी भ्रष्टाचाराच्या आरोपांनी प्रत्युत्तर दिले होते. आता या बॅनरबाजीमुळे हा वाद अधिकच वाढला आहे. आजच्या सभेत अजित पवार या आरोपांना काय उत्तर देतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी अभिजीत तांबिले यांचे कृषीमंत्र्यांना सविस्तर निवेदन

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. ०५ : इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव, कांदलगाव व तरडगाव येथील उजनी धरण प्रकल्पासाठी संपादित जमिनींच्या मूळ मालक शेतकऱ्यांना न्याय मिळावा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच वर्षानुवर्षे सुरू असलेल्या अन्यायाला वाचा फुटावी, या मागणीसाठी पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अभिजीत राजेंद्र तांबिले यांनी राज्याचे कृषी मंत्री मा. दत्तात्रय (दत्तामामा) भरणे यांची भेट घेऊन सविस्तर लेखी निवेदन सादर केले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, १९७० च्या दशकात उजनी धरण



प्रकल्पासाठी इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव, कांदलगाव व तरडगाव या गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनी माती-मुरूम उचलण्यासाठी शासनाने संपादित केल्या होत्या. त्या काळात शेतकऱ्यांनी मोठ्या त्यागातून आपल्या सुपीक जमिनी दिल्या. मात्र कालांतराने विविध धोरणात्मक निर्णय व अंमलबजावणीतील त्रुटींमुळे मूळ जमीनमालक शेतकऱ्यांचे हक्क बाधित झाले आहेत.

अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चाने पाणीपट्टी भरून शेती विकसित केली असूनही आज त्यांना जमिनीच्या मालकी व वहिवाटीबाबत गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी अनेक कुटुंबांची उपजीविका धोक्यात आली असून हा प्रश्न केवळ कायदेशीर नसून सामाजिक व मानवी दृष्टिकोनातूनही अत्यंत गंभीर असल्याचे अभिजीत तांबिले यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.

निवेदनात त्यांनी नमूद केले की, तत्कालीन उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांनी यापूर्वी शेतकऱ्यांच्या बाजूने सहानुभूतीपूर्वक विचार करून वहिवाटीचे आदेश दिले होते. मात्र आता पुन्हा शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये यासाठी जलसंपदा मंत्री मा. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी चर्चा करून ठोस व कायम स्वरूपी तोडगा काढणे आवश्यक आहे. उजनी प्रकल्पग्रस्त तीनही गावांतील सुमारे २ हजार एकर जमिनीच्या मूळ जमीनमालक शेतकऱ्यांच्या हक्कांचा पुनर्विचार करून ते सुरक्षित करावेत, अशी ठाम मागणी तांबिले यांनी शासनाकडे केली आहे. या निवेदनासोबत संबंधित शेतकऱ्यांच्या सह्यांची यादीही जोडण्यात आली आहे.

दरम्यान, कृषी मंत्री मा. दत्तात्रय भरणे यांनी या विषयाची गंभीर दखल घेत शासनस्तरावर योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे अभिजीत तांबिले यांनी सांगितले. उजनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी हा लढा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# किरकोळ कारणावरून रिक्षाचालकावर प्राणघातक हल्ला

**पिंपरी-चिंचवड, ता. ५ :** पिंपरी-चिंचवड शहरातून एक धक्कादायक घटना समोर आली असून, रिक्षात बसू न दिल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका रिक्षाचालकावर प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. ही घटना चिंचवड येथील शिवाजी चौक परिसरात शनिवारी रात्री घडली. या हल्ल्यात रिक्षाचालक गंभीर जखमी झाला असून, हल्लेखोरांनी त्याच्याकडील रोख रक्कमही लुटली आहे. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




पुणे हे शिक्षणाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. मात्र, पुणे शहर आणि लगतच्या औद्योगिक पिंपरी-चिंचवड परिसरात वाढत चाललेल्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता वाढली आहे. अगदी किरकोळ कारणावरूनही हिंसक प्रकार घडत असून, कोयते आणि इतर धारदार शस्त्रांचा वापर खुलेआम केला जात आहे. शहरात कायद्याचा धाक उरला आहे का, असा सवाल सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. विशेषतः तरुणांमध्ये वाढत चाललेली आक्रमक आणि हिंसक वृत्ती समाजासाठी धोक्याची ठरत असल्याचे चित्र आहे.

या प्रकरणी गजानन जगदेव इंगळे, वय २४, रा. चिखली यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेश महादेव पुजारी, वय १८ आणि उत्कर्ष हनुमंत गुंडे, (वय १८, दोघेही रा. चिंचवड परिसर) यांनी गजानन यांच्या रिक्षातून आनंदनगर येथे सोडण्याची मागणी केली होती. मात्र, काही कारणास्तव गजानन यांनी त्यांना रिक्षात बसवण्यास नकार दिला.

याच गोष्टीचा राग मनात धरून दोन्ही आरोपींनी गजानन यांच्यावर कोयत्याने वार केले. या हल्ल्यात गजानन गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हल्ल्यानंतर आरोपींनी गजानन यांच्याकडील रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली आणि घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी या प्रकरणी दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, आरोपींविरोधात कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. या घटनेमुळे रिक्षाचालकांमध्येही भीतीचे वातावरण पसरले आहे.

# राष्ट्रवादी गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरेंनी काढले खासदार मुरलीधर मोहोळांचे वाभाडे

**पुणे, ता. ५ :** महापालिकेच्या निवडणुका तोंडावर असताना राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पुणे महापालिकेच्या राजकारणात सध्या चांगलीच रणधुमाळी सुरू असून, या पार्श्वभूमीवर त्यांनी खासदार आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर थेट आरोप केले आहेत.

रुपाली ठोंबरे पाटील म्हणाल्या की, राज्यात आम्ही सगळे महायुतीत आहोत, पण महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना वेगवेगळे लढत आहेत. त्यामुळे आरोप-प्रत्यारोप होणारच. मात्र सुरुवात भाजपकडून झाली. मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवारांवर टीका केली नसती, तर



आम्हालाही बोलायची गरजच पडली नसती, असं त्या म्हणाल्या.

मुरली अण्णा आज खासदार आणि केंद्रीय मंत्री झालेत, पण अजित पवार गेली ४० वर्ष राज्याचं राजकारण करतायत. त्यामुळे वडीलधाऱ्या माणसासारखं वागणं अपेक्षित आहे, असा टोला त्यांनी लगावला. अजित पवारांनी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस आयुक्तांना कडक आदेश दिले आहेत. त्यामुळे मोहोळ यांनी आमच्यावर आरोप करण्याआधी स्वतःच्या गिरेबानात डोकावून पाहावं, असंही त्या म्हणाल्या.

स्वतः खालचा अंधार झाकून ठेवून आमच्यावर बोट दाखवायचं, हे चुकीचं आहे. निवडणुका आल्या की विनाकारण अजित पवारांवर आरोप केले जातात. राष्ट्रवादीने कधीही शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना तिकीट दिलं नाही. पण भाजपाने ज्यांना तिकीट दिलंय, ते फरार आरोपी आहेत. त्यावर मुरली अण्णा कधी बोलणार? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. एक बोट आमच्याकडे दाखवत असाल, तर चार बोटं तुमच्याकडे आहेत, हे लक्षात ठेवा, असं म्हणत त्यांनी जोरदार टीका केली.

रवींद्र चव्हाण यांच्यावर बोलताना रुपाली ठोंबरे म्हणाल्या की, आता अचानक शहाणपण सुचतंय का? भाजपाचं एकच धोरण आहे वापरा आणि सोडून द्या. निवडणूक आली की समाजात तेढ निर्माण करायची, नको ती प्रकरणं बाहेर काढायची आणि सत्तेत असल्याचा गैरफायदा घ्यायचा.

एवढंच वाटत होतं, तर तीन वर्षांपूर्वीच मुख्यमंत्र्यांकडे जायला हवं होतं. प्रदेशाध्यक्षांनी अशा बालिश वक्तव्यांपासून दूर राहिलं पाहिजे, असा सल्लाही त्यांनी दिला.प्रवीण दरेकर यांनाही उद्देशून त्या म्हणाल्या की, ही चौकट आधी मोडली कोणी? भाजपचे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ आधी बोलले, आमच्यावर आरोप केले, त्यामुळे आम्हीही त्यांना जशास तसं उत्तर दिलं, इतकंच. महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील राजकारण आता आणखी तापण्याची चिन्हं दिसत आहेत.

# रीलस्टार ऊसतोड मजुरावर ट्रॅक्टरची ट्रॉली कोसळली; लाईव्ह सुरु असातानाच काळाचा घाला

**बीड, ता. ५ :** ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली येऊन ऊसतोड कामगार तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बीड जिल्ह्यात घडली आहे. ऊस वाहतुकीदरम्यान झालेल्या भीषण अपघातात कुटुंबप्रमुखाचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मयत गणेश डोंगरे हा सोशल मीडियावर रील्स बनवणारा तरुण म्हणूनही ओळखला जात होता. दुर्दैव म्हणजे हा अपघात त्याची पत्नी फेसबुक लाईव्ह करत असतानाच तिच्या डोळ्यादेखत घडला.



बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. ऊस हंगाम सुरू झाला की येथील हजारो कुटुंबे उदरनिर्वाहासाठी राज्यातील विविध भागांत ऊसतोडीसाठी जातात. वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी सोन्नाखोटा येथील रहिवासी असलेले गणेश डोंगरे आणि त्यांची पत्नी अश्विनी हेही ऊसतोडीसाठी गेले होते. मेहनत करून कुटुंबाचे भविष्य घडवण्याचे स्वप्न उराशी बाळगून हे दाम्पत्य आपल्या तीन चिमुकल्या मुलींसह ऊसतोडीचे काम करत होते.

ऊस वाहतुकीदरम्यान ट्रॅक्टर ट्रॉलीचा अपघात झाला आणि ट्रॉली गणेश यांच्या अंगावरून गेली. यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे त्यांच्या वृद्ध आई-वडिलांवर, पत्नीवर आणि तीन लहान मुलींवर मोठा आघात झाला आहे. कुटुंबाचा कर्ता पुरुष अचानक गेल्याने डोंगरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गणेश डोंगरे यांच्याकडे केवळ १ एकर शेती होती. घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने गावात राहून खर्च भागत नव्हता. पत्र्याच्या शेडमध्ये राहणाऱ्या या कुटुंबाला रोजच्या गरजांसाठी संघर्ष करावा लागत होता. त्यामुळे गणेश आणि अश्विनी यांनी ट्रॅक्टरच्या साहाय्याने ऊसतोडीचे काम स्वीकारले होते. या दुर्दैवी घटनेमुळे वडवणी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात शोककळा पसरली आहे.

# आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही, मुंबईचा महापौर हा मराठीच होणार

## राज ठाकरेंचा देवेंद्र फडणवीसांना सणसणीत टोला

**मुंबई, ता. ५ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हिंदू मराठी प्रचारावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जोरदार टीका केली आहे. आम्ही हिंदू आहोत, हिंदी नाही. हा महाराष्ट्र आहे आणि महाराष्ट्रातील शहरांमध्ये मराठीचा मान राखलाच पाहिजे. मुंबईचा महापौर मराठीच होणार, अशा स्पष्ट शब्दांत राज ठाकरे यांनी भूमिका मांडली. पेशव्यांच्या काळात मराठेशाहीने बडोदा साम्राज्य उभं केलं, तेव्हा तिथले सगळे महापौर गुजरातीच होते का, असा सवाल करत त्यांनी महाराष्ट्रात मराठी नेतृत्वच असायला हवं, असं ठामपणे सांगितलं.

वचननाम्यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले की, आम्ही विकासाच्या योजना राबवू इच्छितो, मात्र त्यासाठी राज्य किंवा केंद्राची



परवानगी लागते आणि ती दिली जात नाही. अशावेळी विकासकामे अडवून तरी दाखवा, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी उद्धव ठाकरे यांनीही पत्रकारांच्या प्रश्नावर राज ठाकरे उत्तर देत असताना हस्तक्षेप करत, यांना विकासकामे अडवू द्या, यांचं ढोंग तरी समोर येऊ द्या, अशी टिप्पणी केली.

सत्तेबाबत बोलताना राज ठाकरे म्हणाले की, कोणीही सत्तेचा अमरपट्टा घेऊन आलेला नाही. सध्या सत्तेत असलेल्यांना आपण कायम सत्तेत राहू, असा भ्रम झाला असेल तर तो लवकरच दूर होईल. काँग्रेसने पूर्वी जे केलं तेच आम्ही करतोय, अशी कारणे देणे धोकादायक असल्याचेही त्यांनी सांगितले. आज जे चुकीचे पायंडे पाडले जात आहेत, ते उद्या दामदुपटीने पुढे वापरले जातील, असा इशाराही त्यांनी दिला.

राज ठाकरे यांनी बिनविरोध निवडणुकांवरही टीका केली. पश्चिम बंगालमध्ये अशाच प्रकारांविरोधात भाजप सुप्रीम कोर्टात गेला होता, मग महाराष्ट्रात घडणाऱ्या घटनांबाबत भाजपची भूमिका काय आहे, यावर स्पष्ट बोलावे, अशी मागणी त्यांनी केली. महाराष्ट्राला युपी-बिहारसारखं करण्याचा प्रयत्न सुरू असून, देशाला दिशा देणाऱ्या सुसंस्कृत महाराष्ट्राचं वाटोळं होऊ नये, असा इशाराही त्यांनी दिला.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# सत्तेचा माज अन् पैशांचा सपाटा; अजित पवारांनी भाजपला सुनावले खडेबोल



**पुणे, ता. ०५ :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सत्तेत एकत्र असलेले भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस आता एकमेकांचे थेट विरोधक बनले आहेत. महापालिका निवडणुकीत दोन्ही पक्ष एकमेकांविरोधात मैदानात उतरल्याने आरोप-प्रत्यारोपांना जोर आला आहे. भाजपकडून अजित पवार गटावर गुंड प्रवृत्तीच्या लोकांना उमेदवारी दिल्याचा आरोप केला जात असताना, त्याला प्रत्युत्तर देत अजित पवार यांनी भाजपवर सिंचन घोटाळ्याचा मुद्दा पुन्हा उकरून काढत जोरदार टीका केली आहे.

राज्याच्या राजकारणात एकेकाळी गाजलेला सिंचन घोटाळा पुन्हा चर्चेत आला आहे. ज्यांच्यावर या घोटाळ्याचे आरोप झाले होते, त्या अजित पवारांनीच आता भाजपला याच मुद्द्यावरून डिवचले आहे. त्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अजित पवारांना असे वक्तव्य अडचणीचे ठरू शकते, असा इशारा दिला आहे.

२०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या काळात भाजपच्या नेत्यांनी जाहीर सभांमध्ये अजित पवारांना जेलमध्ये टाकू, असे थेट वक्तव्य केले होते. त्याचवेळी सिंचन घोटाळ्याशी संबंधित बैलगाडीभर कागदपत्रे भाजपने चितळे समितीकडे दिल्याचा दावा केला होता. पुराव्यांच्या चार बॅगा बैलगाडीतून नेण्यात आल्याचेही तेव्हा सांगण्यात आले होते. मात्र, ज्या भाजप नेत्यांनी हे आरोप केले, त्यांच्यासोबतच अजित पवार आज सत्तेत सहभागी आहेत.

मागील तीन वर्षांपासून अजित पवार सत्तेत आहेत. २ जुलै २०२३ रोजी ते एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाले होते. त्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस हेही उपमुख्यमंत्री होते. त्यानंतर ५ डिसेंबर २०२४ रोजी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असलेल्या सरकारमध्येही अजित पवार उपमुख्यमंत्री झाले.

मात्र आता महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने अजित पवारांनी भाजपवर थेट हल्लाबोल केला आहे. ज्यांनी माझ्यावर ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांच्यासोबतच मी आज सरकारमध्ये बसलो आहे, असे त्यांनी स्पष्टपणे म्हटले. एवढ्यावर न थांबता त्यांनी भाजपवर शहरातील परिस्थिती बिघडवत असल्याचा आरोप केला. कुत्र्यांच्या नसबंदीच्या कामात पैसे खाल्ले, जिथे मिळतील तिथे पैसे खाण्याचा सपाटा लावला, सत्तेचा माज आल्यामुळे अशी कामे केली जात आहेत, अशी जळजळीत टीकाही अजित पवारांनी केली आहे.

दरम्यान, या आरोप-प्रत्यारोपांमुळे सत्तेत असलेले दोन्ही पक्ष महापालिका निवडणुकीत एकमेकांविरोधात किती आक्रमक भूमिका घेतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## विजय थलापतीचा अखेरचा चित्रपट जन नायकन हाऊसफुल्ल

**बंगळुरू, ता. ५ :** दाक्षिणात्य सुपरस्टार विजय थलापती याचा कारकिर्दीतील अखेरचा चित्रपट जन नायकन ९ जानेवारी रोजी पोंगलच्या मुहूर्तावर प्रदर्शित होतोय. या चित्रपटासाठी चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता असून कर्नाटकात आगाऊ बुकिंगला उदंड प्रतिसाद मिळाला आहे. बंगळुरूमधील विशेष शोची तिकिटे २ हजार रुपयांपर्यंत विकली गेली असूनही सर्व शो हाऊसफुल्ल झालेत. ३३ वर्षांच्या अभिनय कारकिर्दीनंतर वयाच्या ५१ व्या वर्षी विजयने निवृत्ती जाहीर केलीय. तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ वर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला असून, तामिळगा वेत्री कझगम या आपल्या राजकीय पक्षाद्वारे ते पूर्णवेळ समाजकारणात सक्रिय होणार आहेत. ६९ व्या चित्रपटासह विजय रुपेरी पडद्याला कायमचा निरोप देणार असल्याने जगभरातील चाहत्यांसाठी हा भावनिक क्षण ठरतोय.

प्राईम लाईफ



## नारळपाणी पिण्याचे आरोग्यवर्धक फायदे

**पुणे, ता. ५ :** नारळपाणी म्हणजे तहानेवर मस्त गारेगार उपाय. नारळपाणी हा केवळ उन्हावरचा गारेगार उतारा नाही, तर नारळपाण्याचे शरीरासाठी खूप सारे फायदे आहेत. नारळपाणी हे आजारपणा व्यतिरिक्त इतर दिवसांमध्येही पिण्याचा डॉक्टर सल्ला देतात. नारळपाण्यामध्ये असलेले असंख्य गुणधर्म हे आपल्या शरीरासाठी खूप गरजेचे असतात. म्हणूनच नारळपाणी हे कितीही महाग झाले तरी अनेकांच्या रोजच्या आहारात असतेच.

नारळपाण्यात एनर्जी, प्रोटीन, कार्बोहाइड्रेटस्, फाइबर, आयरन, व्हिटॅमिन ए आणि सी मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे आपल्या शरीराला आवश्यक असणारे पोषक तत्व मिळतात.

नारळपाणी पिण्याचे आरोग्यवर्धक फायदे : नारळ पाण्यात फेनोलिक असल्यामुळे, यामुळे कॅन्सर रोखण्यास खूप महत्त्वाची भुमिका नारळपाणी बजावते.

चेहऱ्याच्या त्वचेसाठी नारळपाणी हे खूप महत्त्वाचे मानले जाते. चेहऱ्यावर उजळपणा आणण्यासाठी नारळपाण्यासारखा दुसरा रामबाण उपाय नाही.

वजन कमी करण्यासाठी नारळपाण्याचा वाटा फार मोठा आहे. नारळपाण्यात असलेल्या गुणधर्मांमुळे वजन झपाट्याने कमी होण्यास मदत होते.

नारळपाण्यामध्ये लिपिड कमी असल्याकारणाने, कोलेस्ट्रॉल वाढण्याची भीती नसते. म्हणूनच हृद्यरोगींना डॉक्टर नारळपाणी पिण्याचा सल्ला देतात.

नारळपाण्यात पोटॅशियमच्या असलेल्या मुबलक मात्रेमुळे नारळपाणी ब्लड प्रेशर कंट्रोल करण्यासाठी उत्तम मानले जाते.

फायबरची मात्रा नारळपाण्यात असल्यामुळे, पोटांच्या आजारावर नारळपाणी हे अतिशय गुणकारी मानले जाते. पोटाच्या आरोग्यासाठी म्हणूनच नारळपाणी हे सर्वोत्तम पर्याय मानले जाते.

# कदमवाकवस्ती येथे सहकारी महिलेचा विनयभंग; एकावर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. ५ :** आय लव यु म्हणून महिला कर्मचाऱ्याच्या मॅनेजरने विनयभंग केल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता हवेली) परिसरात १६ जुलै २०२५ ते ३ जानेवारी २०२६ यादरम्यान घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात एकाच्या विरोधात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परमेश्वर साहेबराव शिंदे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी एका २९ वर्षीय विवाहितेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिडीता या लोणी काळभोर परिसरातील एका कंपनीमध्ये काम करीत होत्या. तर आरोपी परमेश्वर शिंदे हा त्या कँपनीमध्ये व्यवस्थापक म्हणून काम करत होता. एके दिवशी पिडीता या घरी असताना आरोपी परमेश्वर शिंदे याने व्हाटस अपवरुन त्यांना आय लव यु चा मेसेज पाठविला होता. सदरचा मेसेज हा आरोपीने चुकीने पाठविला असेल असा विचार करुन पिडीता यांनी या मॅसेजला रिप्लाय दिला नाही. दुसऱ्या दिवशी पिडीता या नेहमीप्रमाणे ऑफिसवर कामाकरीता गेल्या.

पिडीता काम करीत असताना आरोपी परमेश्वर हा त्यांच्याजवळ आला. आरोपीने पिडीतेचा हात पकडला आणि म्हणाला, मी तुला काल मॅसेज केला होता तू पाहुन देखील मला रिप्लाय दिला नाही, खरचं तु मला खुप आवडतेस असे म्हणून पिडीत यांच्या मनास लज्जा उत्पन्न करुन विनयभंग केला. त्यावेळी पिडीता आरोपीला म्हणाल्या की, तुम्ही करीत आहे ते खूप चुकीचे आहे असे म्हणून समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु, आरोपी काहीही ऐकण्याचे परिस्थीतीमध्ये नव्हता. त्यामुळे पिडीता ऑफिसमधून घरी रागाने निघून गेल्या.

आरोपी परमेश्वर याच्या वागणुकीमध्ये काहीतरी बदल होईल? असा विचार करुन ऑफिसला दोन ते तिन दिवस सुट्टी घेतल्यानंतर पिडीता पुन्हा कामावर रुजू झाल्या. परंतु, आरोपी परमेश्वर हा पिडीता ऑफिसमध्ये एकटी असताना वारंवार लगट करून मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. या वारंवार होणाऱ्या त्रासाला कँटाळून पिडीता यांना ऑक्टोंबर २०२५ मध्ये सदर काम सोडून दिले. प्रतिष्ठेला घाबरुन पिडीता यांनी आज पर्यंत तक्रार केली नव्हती.

दरम्यान, ३ जानेवारीला आरोपी परमेश्वर शिंदे याने पिडीता यांना कॉल केला. अश्लील भाषेमध्ये शिवीगाळ करुन म्हणाला की, धंदेवाली तू लफडे लावती, व माझ्या बायकोला काय सांगितले तु. तु घरे जाळायचे कमीशन घेते? अशा आश्लिल भाषेमध्ये शिवीगाळ करुन धमकी दिली.

याप्रकरणी पिडीता यांनी तत्काळ आरोपीच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार आरोपी परमेश्वर शिंदे याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ७५.७८,७९,३५१, ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बँक कर्मचारी संप पुकारणार; सलग तीन दिवस कामकाज बंद राहणार?

**पुणे, ता. ५ :** युनायटेड फोरम ऑफ बँक युनियनने २७ जानेवारी २०२६ रोजी देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. बँक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत बँकेकडून पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याची मुख्य मागणी करण्यात आली आहे. हा संप यशस्वी झाल्यास सलग तीन दिवस बँकांचे कामकाज ठप्प राहण्याची शक्यता आहे.

कारण जानेवारी महिन्यात २५ तारखेला रविवार आणि २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनाची सार्वजनिक सुट्टी आहे. त्यानंतर लगेच २७ तारखेला संपाचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात तीन दिवस बँकेचे कामकाज बंद राहू शकते. यामुळे चेक क्लिअरन्स, रोख व्यवहार आणि इतर वित्तीय कामांवर मोठा परिणाम होऊन व्यवहार पूर्णपणे ठप्प होण्याची भीती आहे. यामुळे नागरिकांना नाहक त्रास होऊ शकतो.

दरम्यान, प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या शनिवारी बँक कर्मचाऱ्यांना सुट्टी असते. तर कर्मचारी संघटना उर्वरित दोन शनिवारीदेखील सुटी मिळावी, अशी मागणी गेल्या अनेक दिवसांपासून करत आहेत. म्हणजेच बँक कर्मचाऱ्यांना आठवड्याचे पाच दिवस काम आणि प्रत्येक शनिवार रविवार सुट्टी हवी आहे.

मार्च २०२४ मध्ये झालेल्या वेतन करारात आयबीए आणि यूएफबीयू यांच्यात या मागणीवर सहमती झाली होती. मात्र, सरकारकडून अद्याप याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नसल्याने बँक कर्मचाऱ्यांनी संप करण्याचा निर्णय घेतला आहे.

## धावत्या रेल्वेखाली उडी घेऊन ३० वर्षीय तरुणाची आत्महत्या

**पुणे, ता. ५ :** पुणे जिल्ह्यातील येवलेवाडी भागामध्ये राहणाऱ्या एका ३० वर्षांच्या तरुणाने रेल्वेखाली उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. रामदास भरत पवार असे या मृत तरुणाचे नाव असून तो एका सलूनमध्ये काम करत होता. या प्रकरणात पोलिसांनी एकूण ७ जणांवर गुन्हा दाखल केला असून त्यात २ महिलांचाही समावेश आहे. या सर्व जणांनी मिळून रामदासला आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तपासादरम्यान असे समोर आले आहे की, रामदासचे त्याच्या सलूनच्या मालकिणीसोबत काही कारणावरून खटके उडाले होते. या वादाचे रूपांतर नंतर मोठ्या छळात झाले. शीतल काळे, अरविंद काळे, सतीश सरोदे, नितीन सरोदे, श्रृती कन्हेरे, ऋषी कन्हेरे आणि मोहन सोनार या सर्वांनी रामदासला गुन्हा दाखल करण्याची आणि जेलमध्ये टाकण्याची भीती घातली होती. तसेच तक्रार मागे घेण्यासाठी त्याच्याकडे ५ लाख रुपयांची मोठी मागणी करण्यात आली होती. या सततच्या धमक्यांमुळे रामदास खूप घाबरला होता आणि प्रचंड मानसिक तणावाखाली वावरत होता.

शेवटी या त्रासाला कंटाळून त्याने धावत्या रेल्वेसमोर उडी मारली. मृत्यूला कवटाळण्यापूर्वी रामदासने वहीत आणि सोशल मीडिया अकाउंटवर एक सविस्तर चिठ्ठी लिहून ठेवली होती. या चिठ्ठीत त्याने नमूद केले होते की, या ७ लोकांच्या छळामुळेच तो आपले आयुष्य संपवत आहे. त्याने या त्रासाबद्दल आपल्या बहिणीलाही पूर्वी सांगितले होते. त्याच्या बहिणीने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेतली आहे.

## जिंती येथील दत्तात्रय तरटे यांचे निधन



**करमाळा, ता. ५ :** रस्त्यांच्या कामाचे ठेकेदार म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले दत्तात्रय किसन तरटे (वय - ९५, रा. जिंती, ता. करमाळा) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर जिंती येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातू, नात सुना व परतुंडे असा परिवार आहे. सांगवी पिंपळे- गुरव भाजप ओबीसी मोर्चाचे सरचिटणीस संजय तरटे यांचे ते आजोबा होत.

## तरुणाला विवस्त्र करुन मारहाण; पिस्तुलातून गोळी झाडून खुनाचा प्रयत्न

**पुणे, ता. ५ :** पुणे शहरात गुन्हेगारा काही संपतच नाही, अशातच केवळ आर्थिक वादातून ३१ वर्षीय तरुणाचे अपहरण करून त्याला विवस्त्र करत अमानुष मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यानंतर पीडिताचा व्हिडिओ काढून त्याच्यावर गोळीबार केल्याचा प्रकार समोर आल्याने शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




पीडित तरुण हा वाहन खरेदी-विक्रीचा व्यवसाय करतो. ३१ डिसेंबर रोजी रात्री जुन्या आर्थिक व्यवहाराच्या वादातून ९ जणांनी त्याला अडवले. आरोपींनी त्याला जबरदस्तीने कारमध्ये बसवून अपहरण केले. त्यानंतर गोकुळनगर परिसरातील एका निर्जन मैदानात नेऊन त्याला विवस्त्र करण्यात आले. येथे आरोपींनी त्याला बेदम मारहाण केली. या संपूर्ण प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण करून पोलिसांत तक्रार दिल्यास व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली.

दहशत निर्माण करण्यासाठी आरोपींनी पिस्तुलाचा धाक दाखवला आणि गोळीबारही केला. सुदैवाने या गोळीबारात तरुण बचावला. मात्र, या घटनेनंतर तो प्रचंड मानसिक तणावात होता. अखेर रविवारी त्याने येवलेवाडी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर काळंगे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. पोलिसांनी या प्रकरणात एकूण ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींचा शोध सुरू आहे.

दरम्यान, पुणे शहरात गेल्या काही काळापासून किरकोळ वादातून होणारे खून आणि प्राणघातक हल्ल्यांच्या घटना वाढताना दिसत आहेत. मागील वर्षात शहरात ७९ खून आणि १५३ खुनाच्या प्रयत्नांचे गुन्हे नोंदवले गेले आहेत. गुन्ह्यांचे प्रमाण कागदोपत्री कमी झाल्याचे दिसत असले तरी भररस्त्यात घडणाऱ्या हिंसक घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण कायम आहे.

## लाडक्या बहिणींना महापालिका निवडणूकीपूर्वी मिळणार खुशखबर

### खटाखट जमा होणार ३ हजार रुपये

**मुंबई, ता. ५ :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात ३१ डिसेंबर २०२५ रोजी नोव्हेंबर महिन्याचा १५०० रुपयांचा हफ्ता जमा झाला. डिसेंबरअखेर असल्याने थकीत तीन महिन्यांचे एकत्रित ४५०० रुपये मिळतील, अशी आशा महिलांना होती; मात्र प्रत्यक्षात केवळ एकच हफ्ता आल्याने अनेकींचा अपेक्षाभंग झाला.




मात्र लाडकी बहीण योजनेच्या पुढील हफ्ताबाबतची महत्त्वाची माहिती समोर आली आहे. महापालिका निवडणुकांसाठी मतदान येत्या १५ जानेवारीला होणार असून त्यापूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे दोन हफ्ते म्हणजे ३ हजार रुपये पात्र महिलांच्या खात्यात जमा होणार आहे.

मकरसंक्रातीपूर्वी महिलांना दोन महिन्याचे तीन हजार रुपये मिळणार आहेत. लाडक्या बहीण योजनेसाठी पात्र महिलांनी केवायसी करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. आता ती मुदत संपली असल्याने केवायीस केलेल्या महिल्यांच्या खात्यात पैसे जमा होणार आहेत.

**ई-केवायसीचा ऑप्शन हटवला**

दुसरीकडे, ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी न केलेल्या महिलांना २०२६ पासून या लाभाला मुकावे लागण्याची शक्यता आहे. तसेच आता साइटवरून ई-केवायसीचा ऑप्शन देखील हटवण्यात आला आहे. तर तांत्रिक कारणांमुळे ज्यांना एसएमएस आले नाहीत, त्यांनी बँक पासबुक तपासून खात्री करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पुण्यासह राज्यातील १६ मोठ्या बाजार समित्यांना मिळणार राष्ट्रीय दर्जा?

**पुणे, ता. ५ :** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी असून राज्यातील १६ मोठ्या बाजार समित्यांना लवकरच राष्ट्रीय दर्जा मिळणार आहे. राज्य सरकारने या प्रक्रियेला वेग दिला असून विधी व न्याय विभागाने यासंदर्भातील महत्त्वाची अधिसूचना नुकतीच जारी केली आहे. यामध्ये पुणे (ग्रामीण), सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर,नाशिक, चंद्रपूर, बुलढाणा, ठाणे, जळगाव, जालना, सांगली,वाशिम, अकोला,अहिल्यानगर, नागपूर आणि लातूर यांसारख्या प्रमुख शहरांमधील बाजार समित्यांचा समावेश आहे. या समित्यांना ई-नाम प्रणालीशी जोडून तेथील कारभार अधिक पारदर्शक आणि डिजिटल करण्याचा सरकारचा मानस आहे.




नवीन नियमांनुसार ज्या बाजार समित्यांमध्ये दरवर्षी ८० हजार टनांपेक्षा जास्त शेतीमालाची आवक होते, अशा एकूण ५१ समित्यांना हा दर्जा दिला जाणार आहे. पहिल्या टप्प्यात निवडलेल्या १६ समित्यांकडून गेल्या तीन वर्षांतील सर्व आकडेवारी पणन विभागाने मागवली असून ती शासनाकडे सादर करण्यात आली आहे. या प्रक्रियेमुळे आता स्थानिक बाजारपेठा राष्ट्रीय स्तरावर जोडल्या जाणार असून खरेदी-विक्रीच्या व्यवहारात मोठी सुधारणा होणार आहे.

दरम्यान, या निर्णयाचा सर्वात मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे कारण ई-नाममुळे त्यांना त्यांच्या मालासाठी देशभरातील खरेदीदार उपलब्ध होतील. यामुळे लिलाव प्रक्रियेत पारदर्शकता येईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला मिळण्यास मदत होईल. तसेच व्यापाऱ्यांसाठी संपूर्ण देशात एकच परवाना लागू होणार असल्याने शेतीमालाची ने-आण आणि व्यापार करणे अधिक सोपे होईल.

# शरद पवारांसह महाराष्ट्रातील सात खासदार एकाच दिवशी राज्यसभेतून होणार निवृत्त

**मुंबई, ता. ५ :** २०२५ हे वर्ष राजकीय घडामोडी पाहता अत्यंत महत्वाचे वर्ष ठरले आहे. आता २०२६ हे नवीन वर्ष सुरू झाले असून, या वर्षात पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे. दुसरीकडे राज्यसभेतील २४५ खासदारांपैकी ७१ खासदारांचा कार्यकाळ याच वर्षात संपणार असून ते निवृत्त होणार आहेत. या खासदारांमध्ये महाराष्ट्रातील सात खासदारांचा समावेश आहे.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणातील मोठं नाव राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा देखील यामध्ये समावेश असून, त्यांच्यासह महाराष्ट्रातील सात खासदारांचा कार्यकाळ संपणार आहे. विशेष म्हणजे सातही राज्यसभेचे खासदार २ एप्रिल २०२६ मध्ये निवृत्त होणार आहेत.

राज्यसभेतून निवृत्त होणारे खासदार केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपचे माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड आणि खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा समावेश असून, याशिवाय शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी, काँग्रेसच्या खासदार रजनी पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या खासदार डॉ. फौजिया खान हे सर्वजण एकाच दिवशी राज्यसभेतून निवृत्त होणार आहेत.

### नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार?



७१ खासदारांमध्ये खासदारांमध्ये मार्च महिन्यात १, एप्रिलमध्ये ३७, जूनमध्ये २२ तर नोव्हेंबरमध्ये ११ खासदार निवृत्त होणार आहेत. भाजपचे सर्वाधिक ३० खासदार यंदा राज्यसभेतून निवृत्त होत आहेत. निवृत्त होणाऱ्या खासदारांमध्ये काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचा देखील समावेश आहे.

याशिवाय झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन, गुजरातमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शक्तीसिंह गोहिल, तेलंगणातील काँग्रेस नेते अभिषेक मनू सिंघवी, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, माजी केंद्रीय मंत्री उपेंद्र कुशवाह, तृणमूल काँग्रेसचे साकेत गोखले, लोकसभेचे माजी उपसभापती थंबी दुराई आणि द्रमुक नेते तिरुची शिवा हेही राज्यसभेच्या निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत.

**नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार का?**

राज्यसभेत देशाचे राष्ट्रपती यांच्या नामनिर्देशित कोट्यातून खासदारांची नियुक्त करण्यात येते. यामध्ये माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई यांचा कार्यकाळ देखील मार्च २०२६ मध्ये संपणार आहे. त्यामुळे आता राज्यसभेतील निवृत्त होणाऱ्या खासदारांच्या जागी राज्यसभेत कोण कोणाची खासदार म्हणून वर्णी लागणार हे पाहणे महत्वाचे असणार आहे. तसेच नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार का? याकडे देखील लक्ष असणार आहे.